18 DEC 2022

लोकमत

जनसपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# रा. ना. चव्हाणांच्या लिखाणावर चर्चासत्र

## डॉ. डी. टी. शिर्के यांची घोषणा : शाहू ग्रंथाचे प्रकाशन, संशोधन करणाऱ्यांना प्रोत्साहन

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर** : शाहू महाराजांविषयी वेगळा दृष्टिकोन मांडणारे लिखाण वाईच्या रा. ना. चव्हाण यांनी केले आहे. त्यांच्या लिखाणावर विद्यापीठातील विविध अध्यासनांच्या माध्यमातून चर्चासत्र आयोजित करण्यात येईल आणि त्यांच्याविषयीच्या संशोधनाला प्रोत्साहन देण्यात येईल, अशी घोषणा शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू प्रा. डॉ. डी. टी. शिर्के यांनी शनिवारी केले.

रा. ना. चव्हाण प्रतिष्ठान, वाई, सार्थक सांस्कृतिक केंद्र, कोल्हापूर आणि क्रिएटिव्ह टीचर्स फोरम यांच्या विद्यमाने 'लोकशाही समाजवादाची प्रेरक शक्ती : राजर्षी शाहू' या रा. ना. चव्हाण यांच्या ग्रंथाचे प्रकाशन शनिवारी शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू प्रा. डॉ. डी. टी. शिर्के यांच्या हस्ते झाले. अध्यक्षस्थानी राजकीय विश्लेषक प्रा. डॉ. अशोक चौसाळकर होते.



कोल्हापुरात सार्थक सांस्कृतिक केंद्रात 'राजर्षी शाहू' ग्रंथाचे प्रकाशन शनिवारी डी. टी. शिर्के यांच्या हस्ते झाले. यावेळी सुनीलकुमार लवटे, दीपक जगदाळे, अरुण शिंदे, अशोक चौसाळकर, रमेश चव्हाण आणि प्रकाश पवार उपस्थित होते. (छाया : आदित्य वेल्हाळ)

डॉ. शिर्के म्हणाले, रा. ना. चव्हाण यांनी समाजप्रबोधनाची दृष्टी देणारे वैचारिक लेखन केले आहे. त्यांचे चिरंजीव स्वखर्चातून त्यांच्या लिखाणाची ४३ पुस्तके प्रकाशित करतात, हे एकमेव उदाहरण आहे.

अध्यक्षीय भाषणात शाहूंच्या विचारांचा नेमका अन्वयार्थ त्यांच्या तत्कालीन स्थानिक राजकीय आणि सामाजिक घटनांतून वाईच्या रा. ना. चव्हाण यांनी शब्दबद्ध केल्याचे प्रतिपादन चौसाळकर यांनी केले.

ग्रंथाचे संपादक वाईच्या रा. ना. चव्हाण प्रतिष्ठानचे रमेश चव्हाण म्हणाले, शाहूंचे जन्मशताब्दी वर्ष, सत्यशोधक समाजाच्या शतकोत्तर सुवर्णमहोत्सवी वर्ष आणि रा. ना. चव्हाण प्रतिष्ठानच्या स्थापना वर्षाच्या निमित्ताने शाहूंचे वैचारिक लिखाण समोर आणण्याचा प्रयत्न केला आहे.

प्रा. डॉ. प्रकाश पवार यांनी लोकशाही समाजवाद आणि शाहूंची समाजसुधारणा या मुद्द्यावर रा. ना. चव्हाण यांनी अहिंसक भाषाशैलीत प्रकाश टाकल्याचे सांगितले. प्रा. डॉ. अरुण शिंदे यांनी रा. ना. चव्हाण यांनी त्यांच्या लिखाणातून संपूर्ण शाहूदर्शन घडविल्याचे सांगितले.

प्रारंभी क्रिएटिव्ह टीचर्स फोरमकडून कुरुकलीच्या वेदांतिका तिराळे हिला कुलगुरूंच्या हस्ते सायकल भेट दिली. फोरमचे दीपक जगदाळे यांनी प्रास्तविक केले तर सागर बगाडे यांनी आभार मानले. संजय कळके यांनी सूत्रसंचालन केले. यावेळी रमेश चव्हाण यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी डॉ. रमेश जाधव, डॉ. सुनीलकुमार लवटे, वैशाली चव्हाण, चंद्रकांत निकाडे आदी उपस्थित होते.

1 8 DEC 2022

सकाळ

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# राजर्षी नव्याने अभ्यासणे गरजेचे

## कुलगुरू डॉ. शिर्के : रमेश चव्हाण संपादित पुस्तकाचे प्रकाशन

सकाळ वृत्तसेवा

**कोल्हापूर, ता. १७ :** राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांच्या कार्याचे संशोधकांनी नव्याने संशोधन करून समाजाला नवी दृष्टी द्यावी, असे आवाहन कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांनी आज येथे केले. रा. ना. चव्हाण यांच्या कार्याविषयी शिवाजी विद्यापीठात चर्चा घडवून आणली जाईल, अशी ग्वाही त्यांनी दिली.

रा. ना. चव्हाण प्रतिष्ठान, सार्थक सांस्कृतिक केंद्र व क्रिएटिव्ह टीचर्स फोरमतर्फे रमेश चव्हाण संपादित 'लोकशाही समाजवादाची प्रेरकशक्ती : राजर्षी शाहू,' ग्रंथाचे आज प्रकाशन झाले. त्याप्रसंगी ते बोलत होते. ज्येष्ठ राजकीय विश्लेषक प्रा. डॉ. अशोक चौसाळकर अध्यक्षस्थानी होते. व्हिनस कॉर्नर परिसरातील सार्थक केंद्र येथे कार्यक्रम झाला.

डॉ. शिर्के म्हणाले, 'रा. ना. चव्हाण यांनी आपल्या लेखनातून शाहूंच्या कार्याची मांडणी केली. त्यांच्या लिखाणाच्या आधारे शाहू राजे नव्याने अभ्यासणे समाजाच्या हिताचे ठरणार आहे. रमेश चव्हाण यांनी शाहूंवरील वैचारिक ग्रंथ सोप्या शब्दांत लिहिण्याचा प्रयत्न केला आहे. विद्यापीठात रा. ना. चव्हाण सत्यशोधक अध्यासन व्हावे, ही चव्हाण यांची मागणी आहे. ते स्थापन करणे स्वागतार्हही ठरेल. मात्र, विद्यापीठात अनेक अध्यासने असून, त्यांच्याशी समन्वय साधून चव्हाण यांच्या कार्याविषयी चर्चा घडवून आणणे महत्त्वपूर्ण ठरेल.'

डॉ. चौसाळकर म्हणाले, 'महाराष्ट्राचे प्रबोधनविश्व खुले करण्याचे काम चव्हाण यांनी केले आहे. त्यांना तत्कालीन समाजाची जाण होती. १९३५ नंतर त्यांनी स्वातंत्र्य चळवळीला विरोध कसा झाला, याची माहिती दिली आहे. तसेच .क्षात्रजगद्गुरू समाजाच्या अपेक्षा पूर्ण का करू शकले नाहीत, त्यांच्यासमोर कोणत्या अडचणी होत्या, हेही मांडले आहे.'

प्रा. डॉ. प्रकाश पवार म्हणाले, 'चव्हाण यांचा काळ लोकशाही व समाजवादाचा होता. त्यांनी लोकशाहीच्या चौकटीत लेखन केले. त्यांची भाषा शैली अहिंसक असून, ते समाजवादाच्या भाषा शैलीचे वैशिष्ट्य आहे. त्यांनी महात्मा गांधी व शाहूंना जोडण्याचा प्रयत्न केला. रानडे व शाहू वैचारिकदृष्ट्या कसे एक झाले, याचीही त्यांनी मांडणी केली.' प्रा. डॉ. अरुण शिंदे चव्हाण यांनी रा. ना. चव्हाण यांनी सत्यशोधक व प्रार्थना समाजाचा मेळ घातला, असे सांगितले. या वेळी दीपक जगदाळे, डॉ. सुनीलकुमार लवटे, वैशाली चव्हाण उपस्थित होते.



कोल्हापूर : ग्रंथाचे प्रकाशन करताना शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के. शेजारी डॉ. सुनीलकुमार लवटे, दीपक जगदाळे, डॉ. अरुण शिंदे, डॉ. अशोक चौसाळकर, रमेश चव्हाण, प्रकाश पवार आदी.

### स्वखर्चाने त्रेचाळीस पुस्तके प्रकाशित

कुलगुरू डॉ. शिर्के म्हणाले, 'रमेश चव्हाण यांनी स्वखर्चाने त्रेचाळीस पुस्तके प्रकाशित केली असून, या काळात आमचा प्राध्यापक वर्ग कोठे होता, असा विचार मनात डोकावतो. स्वखर्चाने पुस्तके प्रकाशित करण्याचे त्यांचे हे रेकॉर्ड असेल.'

1 8 DEC 2022 लोकमत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# प्रिया पाटील राज्याची सदिच्छा दूत

## कोरोनाकाळातील कामाची दखल : पाचशेवर मृतदेहांवर केले अंत्यसंस्कार

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** कोरोनाकाळात शववाहिकेवर चालक म्हणून काम केलेल्या प्रिया पाटीलची राष्ट्रीय सेवा योजनेच्यावतीने राबविल्या जाणाऱ्या सामाजिक व शैक्षणिक उपक्रमात युवकांचा सहभाग व योजनांच्या प्रचार-प्रसारासाठी सदिच्छा दूत म्हणून नियुक्ती झाली आहे. कोरोना काळात केलेल्या कामाची शासनाने एवढी दखल घेऊन माझी नियुक्ती केली याचे समाधान आहे. यापुढेही मी सामाजिक कार्य करत राहीन, अशी प्रतिक्रिया प्रियाने 'लोकमत'ला दिली.

राष्ट्रीय सेवा योजनेअंतर्गत विद्यार्थ्यांसाठी व्याख्याने, त्यांच्याशी संवाद अशा उपक्रमांचे आयोजन केले जाते. या कार्यक्रमांमार्फत शासनाच्या विविध योजना, उपक्रम, उद्दिष्ट्ये साध्य करण्याचे काम सदिच्छा दूत म्हणून प्रिया पाटील करणार आहे. ती विवेकानंद महाविद्यालयात बी. एस्सी.च्या शेवटच्या वर्षात शिकत असून भवानी फाउंडेशनच्या माध्यमातून कोरोना काळात सुरू असलेल्या शववाहिकेवर चालक म्हणून तिने काम केले.

याकाळात हर्षल सुर्वे व सहकाऱ्यांच्या मदतीने पाचशेहून अधिक मृतदेहांवर अंत्यसंस्कार करण्यात आले. या कामासाठी तिला वडील प्रकाश पाटील व आई मनीषा पाटील यांचे पाठबळ लाभले. तिच्या या कामाचे कौतुक झाले होते.



### गरज पडेल तेव्हा मदत

प्रियाला सामाजिक कार्याची आवड असून यापुढेही ती हे काम करत राहणार आहे. शासनाच्या विविध योजनांसाठी गरज पडेल, त्यावेळी मदत करेन, असा मनोदय तिने व्यक्त केला.

18 DEC 2022 लोकमत जनसंपर्क कक्ष शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# बहुरंगी फुला-पानांनी सजले महावीर गार्डन

## गार्डन्स क्लबच्या पुष्प प्रदर्शनाला प्रारंभ : आज समारोप

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** पांढरे, लाल गुलाब, सूर्यफुलापासून जरबेरापर्यंत, शेवंती, निशिगंध, जिनिया, झेंडू, डेलिया, कॅक्टससह विविध जातींची बहुरंगी व बहुढंगी फुलं, बोन्साय, सॅलड डेकोरेशन फुला-पानांची सुंदर रचना, बागेचे सौंदर्य खुलवणाऱ्या लँडस्केप डिझाईन, फुलापानांनी, झाडांच्या विविध प्रकारच्या साहित्यांनी वेशभूषा केलेल्या स्टॅच्यू अशा सर्वांगसुंदर रचनेचे महावीर गार्डनला जणू निसर्गाच्या अलंकारांनी सजलेल्या नववधूचे सौंदर्य आले. निमित्त होते कोल्हापूर महापालिका व गार्डन्स क्लबच्या वतीने आयोजित पुष्प प्रदर्शनाचे.

या दोन दिवसीय प्रदर्शनाचे उद्घाटन अप्पर जिल्हाधिकारी संजय शिंदे यांच्या हस्ते झाले. यावेळी त्यांनी कोल्हापूरला फुलांचे शहर बनवूया, असे आवाहन केले. यावेळी शहर अभियंता नेत्रदीप सरनोबत, उद्योगपती सचिन शिरगावकर, शांतादेवी डी. पाटील व मौर्या ग्रुपचे संचालक अवधूत हरमळकर, गोकुळचे माजी संचालक अरूण नरके, माजी नगरसेवक सत्यजित कदम, राहुल चव्हाण उपस्थित होते.



प्रदर्शनात मांडण्यात आलेल्या वेगवेगळ्या प्रकारच्या फुलांचे सौंदर्य पाहताना मुली. (छाया : आदित्य वेल्हाळ)

क्लबच्या अध्यक्षा कल्पना सावंत यांनी हरित समृद्धी वाढावी या उद्देशाने १९७३ सालापासून ते आतापर्यंत अविरतपणे हे प्रदर्शन आयोजित करण्यात येत असल्याचे सांगितले. यावेळी पुष्पप्रदर्शनाबरोबरच गुलाब आणि विविध प्रकारची फुले, पुष्परचना, कुंडीतील रोपे, फुले, पाने व पाकळ्यांची रांगोळी, बुके, सॅलड डेकोरेशन, बोन्साय, मुक्त रचना, लँडस्केपिंग या स्पर्धा झाल्या. आज, रविवारपर्यंत प्रदर्शन सुरू राहणार असून, त्याचा लाभ कोल्हापूरकरांनी घ्यावा, असे आवाहन करण्यात आले आहे. यावेळी क्लबचे उपाध्यक्ष शशिकांत कदम, सचिव पल्लवी कुलकर्णी, प्रभारी उद्यान अधीक्षक समीर व्याघ्रांबरे उपस्थित होते.

- किंग ऑफ द शो गुलाब : महालक्ष्मी पशुखाद्य,
- क्वीन ऑफ द शो गुलाब : शिवाजी विद्यापीठ



स्टॅच्युला करण्यात आलेली पाना-फुलांची वेशभूषा.

लोकमत

# आंतरराष्ट्रीय प्रशिक्षणात विद्यापीठाचे प्राध्यापक

## व्हिएतनाम येथे पार पडला उपक्रम

लोकमत न्यूज नेटवर्क

कोल्हापूर : हनोई (व्हिएतनाम) येथील रशियन हाऊसमध्ये ४ ते ७ डिसेंबरदरम्यान आयोजित केलेल्या आंतरराष्ट्रीय प्रशिक्षण अभ्यासक्रमात कोल्हापुरातील शिवाजी विद्यापीठाच्या रशियन भाषा विभागाच्या प्राध्यापकांनी सहभाग नोंदविला.

'द रशियन फेडरल एजन्सी फॉर ह्युमॅनिटेरियन कोऑपरेशन' या रशियन संस्थेच्या आशियाई देशातील विविध विद्यापीठांत रशियन भाषा शिकवणाऱ्या शिक्षकांसाठी एका प्रगत प्रशिक्षण अभ्यासक्रमाचे आयोजन केले होते. भाषिक वातावरणाच्या अभावात परदेशी भाषा म्हणून रशियन भाषा अध्यापन पद्धती विकसित करण्यासाठी हनोई येथील 'सेंटर फॉर द सपोर्ट ऑफ सोशल, कल्चरल ॲण्ड एज्युकेशनल प्रोजेक्ट्स'च्या वतीने शिवाजी विद्यापीठातील विदेशी भाषा केंद्राच्या रशियन भाषा अध्यापकांना आमंत्रित करण्यात आले होते. याअंतर्गत विभागाच्या सहयोगी प्राध्यापक डॉ. मेघा पानसरे व सहयोगी अध्यापक शीतल कुलकर्णी, प्रियांका माळकर व अभिषेक जोशी यांनी या प्रशिक्षण अभ्यासक्रमात सहभाग घेत ते यशस्विरीत्या पूर्ण केले. हनोई, व्हिएतनाम दौऱ्यात रशिया व विविध आशियाई देशांतील रशियन भाषातज्ज्ञांनी सांस्कृतिक व शैक्षणिक सद्य:परिस्थिती यावर सर्वच सहभागींचे वैचारिक आदानप्रदान झाले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

18 DEC 2022
महासत्ता

# भाषा हे संस्कृतीचे द्योतक-डॉ. देवराळकर

कोल्हापूर,ता.१७(प्रतिनिधी)-

भाषा ही अनेक संदर्भ घेऊन येत असते.भाषांतर करताना भाषांतरकाराला दोन्ही भाषांची संस्कृती माहित असणे आवश्यक आहे. त्यामुळे भाषा हे संस्कृतीचे द्योतक आहे,असे प्रतिपादन अमरावती येथील शासकीय विदर्भ ज्ञान–विज्ञान संस्थेच्या इंग्रजी विभागाचे सहयोगी प्राध्यापक डॉ.धनंजय देवराळकर यांनी केले.

शिवाजी विद्यापीठाच्या मराठी विभाग आणि दूरशिक्षण आणि ऑनलाईन शिक्षण केंद्र यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित विद्यापीठ अनुदान आयोग नवी दिल्ली यांचा उपक्रम भारतीय भाषा उत्सव अंतर्गत भाषांतराचे सांस्कृतिक महत्व या विशेष ऑनलाईन व्याख्यानात ते प्रमुख पाहुणे म्हणून बोलत होते. अध्यक्षस्थानी शिवाजी विद्यापीठाचे प्र.कुलसचिव डॉ.व्ही.एन.शिंदे हे होते. यावेळी मराठी विभागप्रमुख डॉ.नंदकुमार मोरे यांनी मनोगत व्यक्त केले. यावेळी संचालक प्रा.डॉ. डी.के.मोरे, उपकुलसचिव डॉ.एन.जे. बनसोडे, सी. एस.कोतमिरे उपस्थित होते.

डॉ.देवराळकर म्हणाले की, भाषा हे मानवाला मिळालेले वरदान आहे.विचार जतन करण्यासाठी भाषेचा वापर मनुष्य करीत आहे.भाषांतर आणि संस्कृती यांचा जवळचा संबंध आहे.इतर भाषा समजून घेण्यासाठी ती भाषा येणे व तेथील संस्कृती माहित असणे आवश्यक आहे.

सध्या बदलत्या विज्ञान आणि तंत्रज्ञानामुळे भाषांतरामध्ये अनेक रोजगाराच्या संधी उपलब्ध होत आहेत.नव्या शैक्षणिक धोरणानुसार स्थानिक भाषेला महत्व दिलेले आहे त्यामुळे मराठी भाषा ही ज्ञान भाषा झाली पाहिजे. भाषा हे संस्कृतीचे मोठे वाहक आहे.याचे महत्व भाषांतरकारांनी ओळखले पाहिजे.या व्याख्यानासाठी दूर शिक्षणाचे व मराठी अधिविभागाचे विद्यार्थी,समन्वयक व सहा.प्राध्यापक ऑनलाइन पद्धतीने उपस्थित होते.

18 DEC 2022 महासत्ता

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# रोजगाराच्या संधी देण्यासाठी शिवाजी विद्यापीठ कटिबध्द-डॉ.ओझा

कोल्हापूर,ता.१७(प्रतिनिधी)-
..............................

संगणकशास्त्र विषयाच्या विद्यार्थ्यांना इंटर्नशिप तसेच सर्वोत्तम रोजगाराच्या संधी प्राप्त करून देण्यासाठी शिवाजी विद्यापीठ कटिबद्ध असून विद्यापीठातर्फे घेण्यात आलेल्या इंटर्नशिप मेळाव्यामध्ये १२०० विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला तर ३० आय. टी. कंपन्या विद्यार्थ्यांना इंटर्नशिप देण्यासाठी उपलब्ध होत्या, अशी माहिती शिवाजी विद्यापीठाच्या संगणकशास्त्र अधिविभागप्रमुख डॉ. कविता ओझा यांनी दिली.

संगणकशास्त्र अधिविभाग, सेंट्रल प्लेसमेंट सेल, शिवाजी विद्यापीठ आणि आय. टी. असोसिएशन कोल्हापूर यांच्या संयुक्त विद्यमाने शिवाजी विद्यापीठात इंटर्नशिप मेळावा संपन्न झाला. इंटर्नशिप मेळाव्याच्या उद्घाटन तंत्रज्ञान अधिविभागाचे संचालक प्रा. डॉ. एस. एन सपली यांच्या हस्ते करण्यात आले. इंटर्नशिप मेळाव्यास महाराष्ट्राच्या विविध भागातील १२०० विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. तर कोल्हापुरातील ३० आय. टी. कंपन्या विद्यार्थ्यांना इंटर्नशिप देण्यासाठी उपलब्ध होत्या. सर्व विद्यार्थ्यांना शिवाजी विद्यापीठातर्फे रोजगार कौशल्ये आणि संगणकशास्त्र विषयाचे व्यावसायिक प्रशिक्षण मोफत दिले.

प्रास्ताविक संगणकशास्त्र अधिविभागप्रमुख डॉ. कविता ओझा यांनी केले. समन्वयक प्रा.डॉ.गजानन राशीनकर यांनी सेंट्रल प्लेसमेंट सेलकडून विद्यार्थ्यांना नोकरीच्या विविध संधी उपलब्ध करून देण्याबात सुरु असलेल्या वेगवेगळया उपक्रमाबाबत विद्यार्थ्यांना माहिती दिली. यावेळी आय.टी.असोसिएशनचे अध्यक्ष प्रताप पाटील यांनी विद्यार्थ्यांना सॉफ्टवेअर उद्योगामध्ये आवश्यक कौशल्य प्रशिक्षण व इंटर्नशिपच्या संधी उपलब्ध करून देण्याबाबत सर्वोतोपरी मदत करण्याचे आश्वासन दिले.

डॉ. उर्मिला पोळ यांनी आभार मानले. हा कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी डॉ. विजयकुमार कुंभार, डॉ.कबीर खराडे,डॉ.स्मिता कोटकर, डॉ.शितल गायकवाड, जयकुमार भोसले, गणेश पाटील, श्रीकांत भोसले यांनी परिश्रम घेतले.

18 DEC 2022
पुढारी
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# कोल्हापूरला फुलांचे शहर बनवूया

## अप्पर जिल्हाधिकारी संजय शिंदे; गार्डन क्लबच्या पुष्पप्रदर्शनाचे उद्घाटन

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

कोल्हापूर महानगरपालिका, गार्डन क्लब आणि नागरिकांच्या समन्वयातून शहरातील उद्याने विकसित करून कोल्हापूरला फुलांचे शहर बनवूया, असे प्रतिपादन अप्पर जिल्हाधिकारी संजय शिंदे यांनी केले.

महानगरपालिका व गार्डन क्लब कोल्हापूर यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित पुष्पप्रदर्शनाच्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते. महावीर उद्यानात हा कार्यक्रम झाला. कार्यक्रमास शहर अभियंता नेत्रदीप सरनोबत, उद्योगपती सचिन शिरगावकर, सौ. शांतादेवी डी. पाटील व अवधूत हरमळकर, गोकुळचे माजी संचालक अरुण नरके, माजी नगरसेवक सत्यजित कदम, राहुल चव्हाण उपस्थित होते. गार्डन क्लबच्या अध्यक्षा कल्पना सावंत यांनी प्रास्ताविक केले. यावेळी शशिकांत कदम, पल्लवी कुलकर्णी, प्रभारी उद्यान अधीक्षक समीर व्याघ्रांबरे, सहायक उद्यान अधिकारी राम चव्हाण, डॉ.अल्पना चौगुले, जयश्री कजारीया, शैला निकम आदी उपस्थित होते.



**कोल्हापूर : पुष्पप्रदर्शनातील 'किंग ऑफ द शो' व 'क्विन ऑफ द शो'चा किताब मिळविलेले गुलाब.**

'किंग ऑफ द शो' गुलाबचा किताब महालक्ष्मी पशुखाद्यला तर 'क्वीन ऑफ द शो' गुलाबचा किताब शिवाजी विद्यापीठास देण्यात आला.

पुढारी

# परीक्षा अर्जातच आता मतदार नोंदणीचा रकाना

पुणे : पुढारी वृत्तसेवा

महाविद्यालयीन विद्यार्थ्यांच्या परीक्षा अर्जातच आता नवीन मतदार नोंदणीसाठी रकाना उपलब्ध करून देण्यात येणार आहे. त्याचबरोबर वर्षातून चारवेळा मतदार नावनोंदणीसाठी संधी मिळणार आहे. तशा प्रकारची सुविधा विद्यार्थ्यांना उपलब्ध करून द्यावी, असे स्पष्ट निर्देश विद्यार्थी विकास मंडळामार्फत सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाशी संलग्न महाविद्यालयांना देण्यात आले आहेत.

पुढारी



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर विभागीय तायक्वाँदो स्पर्धेत यश मिळविणारे झेनिथ तायक्वाँदो अॅकॅडमीचे खेळाडू : राजश्री सुतार, सानिका मुतनाळे, रसिका कावळे (सर्वांना सुवर्ण), वैष्णवी सुतार (रौप्य), प्रणव पोफळे (कांस्य). सर्वांना प्रशिक्षक देवेंद्र गवळी, संस्थापक सचिव दिलीप गवळी यांचे मार्गदर्शन लाभले.

18 DEC 2022
पुढारी

# ज्युदो स्पर्धेत केएमसी कॉलेजची बाजी

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

शिवाजी विद्यापीठ अंतर्गत आंतर विभागीय ज्युदो स्पर्धा शिवाजी विद्यापीठ येथे झाल्या. त्याबरोबरच महापालिका व जिल्हा क्रीडा कार्यालयाच्या वतीने झालेल्या स्पर्धेमध्ये महापालिन केले.

विद्यापीठातील स्पर्धेमध्ये केएमसी कॉलेजच्या अंकिता जाधवने ५७ किलो गटात द्वितीय क्रमांक, ऋतुजा खाडेने ७८ किला वरील गटात द्वितीय क्रमांक, रिना परीटने ७८ किलो गटात तृतीय क्रमांक मिळवला. त्याचबरोबर महानगरपालिका व जिल्हा क्रीडा कार्यालय यांच्या वतीने शासकीय क्रीडा स्पर्धा झाल्या. यामध्ये १९ वर्षांखालील टेनिक्वॉइट क्रीडा प्रकारात झाहेद जमादार, रितेश पाटील रोहित तोडकर व दीपक कागले यांनी प्रथम क्रमांक मिळवला. १७ वर्षांखालील कुस्ती प्रकारात रोहित तोडकर व तृप्ती देसाई यांनी आपापल्या वजन गटात प्रथम क्रमांक मिळवला. या सर्वांची विभागीय स्पर्धेसाठी निवड झाली असून १९ वर्षांखालील कुस्ती स्पर्धेमध्ये रोहन खाडे याने ७० किलो गटात द्वितीय व मयूर कांबळेने ७४ किलो गटात तृतीय क्रमांक मिळवला.

या सर्व खेळाडूंना कॉलेजचे प्राचार्य डॉ. अरुण पौडमल, पर्यवेक्षक प्रा. विठ्ठल नाईक, ग्रंथपाल प्रा. रवींद्र मांगले व डॉ. अमित रेडेकर, डॉ. राम पवार व क्रीडाशिक्षक संग्राम तोडकर यांचे मार्गदर्शन लाभले.

पुढारी

# विद्यापीठाचा तलवारबाजीचा पुरुष, महिलांचा संघ रवाना

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

जम्मू-काश्मीरमध्ये होणाऱ्या अखिल भारतीय आंतर विद्यापीठ तलवारबाजी स्पर्धेसाठी शिवाजी विद्यापीठाचा तलवारबाजीचा पुरुष व महिलांचा संघ रवाना झाला.

संघ व्यवस्थापक म्हणून कॅप्टन डॉ. राहुल मगदूम व प्रशिक्षक प्रफुल्ल धुमाळ आहेत. शिवाजी विद्यापीठाचे क्रीडा संचालक डॉ. शरद बनसोडे यांनी दोन्ही संघास शुभेच्छा दिल्या.

जनसंपर्क कक्ष
18 DEC 2022 सकाळ शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# ‘विवेकानंद’ची प्रिया पाटील ‘एनसीसी’ची सदिच्छादूत

कोल्हापूर, ता. १७ : राष्ट्रीय सेवा योजनेच्या उपक्रमांत युवकांना सहभागी करण्यासाठी, शासनाच्या योजनांचा प्रचार व प्रसारासाठी विवेकानंद महाविद्यालयाच्या प्रिया पाटीलची सदिच्छादूत म्हणून निवड झाली. २०२२-२३ साठी उच्च व तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील, प्रधान सचिव विकासचंद्र रस्तोगी, राष्ट्रीय सेवा योजना राज्य संपर्क अधिकारी डॉ. प्रशांतकुमार वनंजे यांनी निवड



**प्रिया पाटील.**

केली. प्रिया सध्या विज्ञान शाखेत पहिल्या वर्षात शिकत असून, कोरोना काळात तिने तीनशेहून अधिक मृतदेहावर अत्यंसंस्कार केले. प्रियाने आज शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. डी.टी. शिर्के यांची सदिच्छा भेट घेतली. कुलगुरू डॉ. शिर्के यांच्या हस्ते तिचा सत्कार झाला. प्रभारी कुलसचिव डॉ. विलास शिंदे, योजनेचे संचालक अभय जायभाये, विवेकानंदचे प्राचार्य डॉ. आर. आर. कुंभार, कार्यक्रम अधिकारी डॉ. संदीप पाटील, डॉ. एच. पी. पाटील, डॉ. आर. जी. कोरबू उपस्थित होते.

1 8 DEC 2022

सकाळ

# कोल्हापूरला फुलांचे शहर बनवू या

## प्रभारी जिल्हाधिकारी संजय शिंदे; गार्डन क्लबच्या पुष्पप्रदर्शनाचे उद्‌घाटन






कोल्हापूर : महावीर गार्डन येथे गार्डन क्लबच्या ५२ व्या पुष्पप्रदर्शनाच्या उद्‌घाटनप्रसंगी प्रभारी जिल्हाधिकारी संजय शिंदे, शहर अभियंता नेत्रदीप सरनोबत, उद्योगपती सचिन शिरगावकर, गार्डन क्लबच्या अध्यक्षा कल्पना सावंत, उपाध्यक्ष शशिकांत कदम, सचिव पल्लवी कुलकर्णी, अवधूत हरमळकर, सत्यजित कदम आदी. दुसऱ्या छायाचित्रात विविध पुष्परचना पाहताना निसर्गप्रेमी.

सकाळ वृत्तसेवा

कोल्हापूर, ता. १७ : 'शहरात जी उद्याने आहेत, त्या सर्वांना महापालिका, गार्डन क्लब, नागरिकांच्या समन्वयातून विकसित करू या. कोल्हापूरला फुलांचे शहर बनवू या,' असे आवाहन प्रभारी जिल्हाधिकारी संजय शिंदे यांनी केले.

कोल्हापूर महापालिका, गार्डन क्लबतर्फे महावीर उद्यानामध्ये आयोजित पुष्प प्रदर्शनाच्या उद्‌घाटनप्रसंगी ते बोलत होते. हे प्रदर्शन उद्यापर्यंत (ता. १८) असेल. शहर अभियंता नेत्रदीप सरनोबत, उद्योगपती सचिन शिरगावकर, सौ. शांतादेवी डी. पाटील, मौर्या ग्रुपचे संचालक अवधूत हरमळकर, 'गोकुळ'चे माजी संचालक अरुण नरके, माजी नगरसेवक सत्यजित कदम, राहुल चव्हाण प्रमुख उपस्थित होते. गार्डन क्लबचे हे ५२ वे पुष्पप्रदर्शन आहे.

गार्डन क्लबच्या अध्यक्षा कल्पना सावंत म्हणाल्या, 'हरित समृद्धी वाढावी यासाठी दरवर्षी हे पुष्प प्रदर्शन भरवले जाते. जागतिक नकाशावर गार्डन क्लबने आता स्थान मिळवलेले आहे.'

यानिमित्त पुष्पप्रदर्शनाबरोबरच अनेक स्पर्धांचे आयोजन केले आहे. यामध्ये गुलाब आणि विविध प्रकारची फुले, पुष्परचना, कुंडीतील रोपे, फुले, पाने आणि पाकळ्यांची रांगोळी, बुके, सॅलड डेकोरेशन, बोनसाय, मुक्त रचना, लॅन्डस्केपिंग आदी स्पर्धांचा समावेश आहे.

बॉटनिकल फॅशन शो झाला. प्रदर्शनाचा लाभ घेण्याचे आवाहन क्लबने केले. उपाध्यक्ष शशिकांत कदम, सचिव पल्लवी कुलकर्णी, महापालिका अधिकारी, प्रभारी उद्यान अधीक्षक समीर व्याघ्रांबरे, सहाय्यक उद्यान अधिकारी राम चव्हाण, डॉ. अल्पना चौगुले, जयश्री कजारीया, शैला निकम, संगीता कोकितकर, रवींद्र साळुंखे, डॉ. प्रमिला बत्तासे, डॉ. धनश्री पाटील आदी उपस्थित होते.

### पुरस्कार असे

- किंग ऑफ द शो गुलाबचा किताब - महालक्ष्मी पशुखाद्य
- क्वीन ऑफ द शो गुलाबचा किताब - शिवाजी विद्यापीठ

सकाळ



वारणानगर : डॉ. गुरव यांचे संदर्भ ग्रंथ देऊन स्वागत करताना प्राचार्य डॉ. चिकुर्डेकर. सोबत समन्वयक डॉ. पांडव, सुनील पवार, डॉ. खोत, प्रा. बसनाईक.

# प्रामाणिक करदात्यांची गरज

## प्रा. डॉ. गुरव; वारणा महाविद्यालयात कार्यशाळा

वारणानगर, ता. १७ : 'कर बचत कौटुंबिक गरज असली तरीही देशाला प्रामाणिक करदात्यांची गरज आहे. भविष्यातील अडचणींना सामोरे जाण्यासाठी कुटुंबाचा दैनंदिन खर्च भागवून बचतीची सवय लावली पाहिजे, असे मत शिवाजी विद्यापीठाच्या वाणिज्य आणि व्यवस्थापन विभागप्रमुख प्रा. डॉ. ए. एम. गुरव यांनी व्यक्त केले.

येथील यशवंतराव चव्हाण वारणा महाविद्यालयात शिवाजी विद्यापीठ अग्रणी महाविद्यालय उपक्रमांतर्गत 'कर बचत आणि गुंतवणूक' विषयावर कार्यशाळा झाली. कार्यशाळेला करवीर, पन्हाळा, शाहूवाडी, गगनबावडा तालुक्यांतील १५ हून अधिक महाविद्यालयांतील प्राध्यापक, विद्यार्थी उपस्थित होते. डॉ. आर. एस. पांडव यांनी स्वागत केले.

अध्यक्ष प्राचार्य डॉ. प्रकाश चिकुर्डेकर म्हणाले, "राष्ट्र उभारणीच्या कार्यात करदात्यांचे योगदान असून करदात्यांना गुंतवणुकीसाठी प्रोत्साहित करणे गरजेचे आहे."

डॉ. आर. एस. पांडव, श्रानू ग्रुपचे सुनील पवार, प्रा. आर. बी. बसनाईक, नॅकचे समन्वयक डॉ. एस. एस. खोत, हरिष गायकवाड, दिलीप पाटील यांनी सहभाग नोंदविला. डॉ. शुभांगी भोसले यांनी सूत्रसंचालन, डॉ. डी. आर. धेडे यांनी आभार मानले.

सकाळ



बिद्री : अभ्यासक्रमाच्या उद्‌घाटनप्रसंगी बोलताना प्रा. डॉ. होडगे, शेजारी प्राचार्य डॉ. पाटील, भैरवनाथ डवरी आदी.

# बिद्रीमध्ये ग्रामीण पत्रकारिता व जनसंवाद अभ्यासक्रम

बिद्री, ता. १७ : पत्रकारिता करिअरसाठी उत्तम पर्याय आहे. त्याचा विद्यार्थ्यांनी गांभीर्याने विचार करून ग्रामीण पत्रकारिता अभ्यासक्रम अभ्यासावा, असे मत सदाशिवराव मंडलिक महाविद्यालयाचे मराठी विभागप्रमुख प्रा. डॉ. शिवाजी होडगे यांनी व्यक्त केले. बिद्री (ता. कागल) दूधसाखर महाविद्यालयात शिवाजी विद्यापीठ मान्यताप्राप्त आणि मराठी विभाग आयोजित ग्रामीण पत्रकारिता आणि जनसंवाद अभ्यासक्रमाच्या उद्‌घाटनप्रसंगी ते बोलत होते. अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. संजय पाटील होते. या वेळी ज्येष्ठ साहित्यिक भैरवनाथ डवरी यांनी साहित्य आणि पत्रकारितेवर मार्गदर्शन केले. टी. एम. सरदेसाई यांनी मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमाला डॉ. एस. ए. साळोखे, डॉ. एन. डी. पाटील, डॉ. सी. वाय. जाधव, डॉ. एल. एस. करपे, प्रा. ए. बी. माने, प्रा. सुहानी पाटील, एस. के. पाटील, बाबासो पोवारसह प्राध्यापक, प्रशासकीय अधिकारी, कर्मचारी व विद्यार्थी उपस्थित होते. समन्वयक प्रा. डॉ. प्रदीप कांबळे यांनी स्वागत, प्राची चौगले हिने सूत्रसंचालन तर आभार शिवानी पाटील यांनी मानले.

सकाळ

# विद्यापीठाचा टेबल टेनिस संघ जाहीर

कोल्हापूर : भोपाळ येथे होणाऱ्या वेस्ट झोन इंटर युनिव्हर्सिटी टेबल टेनिस स्पर्धेसाठी विद्यापीठाचा संघ जाहीर झाला. स्पर्धा २० ते २४ डिसेंबर दरम्यान होणार आहेत. या टीम मध्ये ऋषिकेश नलवडे-कर्णधार, प्रतीक जाधव, वेदांत तांबे, साईनाथ खरे व सुमंतू साळुंखे यांची निवड झाली. संघ व्यवस्थापक म्हणून डॉ. आर. एस. पवार यांची निवड झाली.

18 DEC 2022
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

तरुण भारत

# कोरोनायोद्धा प्रिया पाटील महाराष्ट्राची ब्रँड ॲम्बेसिडर

## राष्ट्रीय सेवा योजनेची सदिच्छादूत म्हणून नियुक्ती : कोल्हापूरच्या सुकन्येच्या कार्याला राजमान्यता

**संजीव खाडे**
कोल्हापूर

कोरोना संकटकाळात शववाहिकेचा चालक बनून पाचशेहून अधिक मृतदेहांवर अंत्यसंस्कार करणारी कोल्हापूरची कोरोनायोद्धा प्रिया पाटील हिची महाराष्ट्राची ब्रँड ॲम्बेसिडर म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. राज्याच्या उच्च व तंत्र शिक्षण विभागाने राष्ट्रीय सेवा योजनेच्या (एनएसएस) सदिच्छादूताची जबाबदारी प्रिया हिच्यावर सोपविली आहे. या संदर्भातील शासकीय आदेश काढला आहे. या निवडीने प्रियाच्या संवेदनशील सामाजिक कार्याला राजमान्यता लाभली आहे.




कोरोना संकटकाळात प्रिया पाटीलने मृतदेहांवर अंत्यसंस्कार केले. तिच्या या सामाजिक कार्याची दखल शासनाने घेतली आहे. तिची समाजाप्रती असलेली कर्तव्याची भावना आणि तिचे कार्य तरुणांसाठी प्रेरणादायी ठरू शकेल.
**-चंद्रकांतदादा पाटील**, उच्च व तंत्र शिक्षण मंत्री

कोरोना संकटकाळातील परिस्थिती पाहिल्यानंतर सामाजिक बांधिलकी जपण्यासाठी कार्य करण्याचे ठरविले. हर्षल सुर्वेनी प्रोत्साहन दिले. आई मनिषा, वडील प्रकाश पाटील यांनी पाठबळ दिले. त्यामुळे कर्तव्य बजावता आले.
**-प्रिया पाटील, सदिच्छादूत**

**तरुण भारत**
विशेष वृत्त

कोरोना लाटेत मृत्यू झालेल्या व्यक्तींवरील अंत्यसंस्काराचा प्रश्न पुढे आला होता. या अत्यंत संवेदनशील कार्यात महापालिकेच्या आरोग्य विभागाच्या कर्मचाऱ्यांबरोबर शासकीय आरोग्य विभाग, शववाहिकेवरील कर्मचारी, स्मशानभूमीतील कर्मचाऱ्यांनी जीव धोक्यात घालत कोरोनाने मृत्यू झालेल्या व्यक्तीला शेवटचा निरोप दिला. काही सामाजिक संघटना, कार्यकर्त्यांचाही समावेश होता. हर्षल सुर्वे, संभाजी उर्फ बंडा साळोखे या कार्यकर्त्यांनी कोरोनाने मृत झालेल्या व्यक्तींवर अंत्यसंस्कार करताना शववाहिकेसह स्वतः योगदान दिले. बैतुलमालच्या जाफरबाबा आणि त्यांच्या कार्यकर्त्यांनीही कोरोनाने मरण पावलेल्यांवर अंत्यसंस्कार केले.

कोरोनाच्या लाटेत कोरोना योद्धे लढत असताना त्यांच्या कार्यात प्रिया पाटील सहभागी झाली. विवेकानंद कॉलेजमध्ये बी. एस्सी.च्या प्रथम वर्षात शिकणाऱ्या प्रियाने समाजाप्रती असलेल्या कर्तव्याच्या भावनेतून शववाहिकेची चालक म्हणून काम करण्याची तयारी दर्शविली. शिवसेना शहर समन्वयक हर्षल सुर्वे यांच्याकडे तिने कार्याची इच्छा व्यक्त केली.

पान ९ पहा

# कोरोनायोद्धा प्रिया पाटील महाराष्ट्राची ब्रँड ॲम्बेसिडर

पान १ वरुन

सुर्वे आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी प्रियाच्या धाडसाचे कौतुक करत तिला प्रोत्साहन आणि पाठबळ दिले. प्रियाने सहकाऱ्यांच्या मदतीने तब्बल पाचशेहून अधिक कोरोनाने मृत्यू झालेल्या व्यक्तींवर अंत्यसंस्कार केले. यावेळी शववाहिकेतून मृत व्यक्तीचा देह स्मशानभूमीकडे नेणे, तेथील कर्मचाऱ्यांच्या सहाय्याने अंत्यसंस्कार करण्याचे पुण्य प्रियाने मिळवले. तिच्या कार्याचा कोल्हापूरकरांनी गौरवही केला होता.

**राजमान्यता, सदिच्छा दूत म्हणून निवड**

प्रियाच्या कार्याची दखल घेत राज्य सरकारच्या उच्च व तंत्र शिक्षण विभागाने तिची राष्ट्रीय सेवा योजना अर्थात एनएसएसची सदिच्छा दूत म्हणून नियुक्ती केली आहे. या संदर्भातील आदेशही काढण्यात आला आहे. राष्ट्रीय सेवा योजनेअंतर्गत विद्यार्थ्यांसाठी व्याख्याने आयोजित करणे, विद्यार्थी व युवकांशी संवाद साधणे इत्यादी कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येते. या कार्यक्रमांच्या माध्यमातून शासनाच्या विविध योजना, उपक्रम, उद्दिष्टे साध्य करण्याचे काम सदिच्छादूत म्हणून प्रिया पाटील करणार आहे. शैक्षणिक वर्ष २०२२-२३ या काळासाठी ही नियुक्ती आहे.

प्रियाच्या नियुक्तीचे राज्याचे उच्च व तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांतदादा पाटील, प्रधान सचिव विकासचंद्र रस्तोगी, राष्ट्रीय सेवा योजना राज्य संपर्क अधिकारी डॉ. प्रशांतकुमार वनंजे यांनी अभिनंदन केले आहे. दरम्यान, हर्षल सुर्वे यांनी प्रतिक्रिया देताना सांगितले की, कोरोनाच्या काळात कुणी पालक आपल्या मुला, मुलींना बाहेर सोडत नव्हते. अशा काळात प्रियाच्या आई, वडिलांनी तिला परवानगी दिली. प्रत्यक्ष कार्य करण्यासाठी आल्यानंतर ती काहीशी घाबरली. पण आम्ही सर्वांनी पाठबळ दिल्यानंतर तिने धाडसाने कार्य सुरू केले. तिची निवड ही पुण्याईचे फलित आहे.

18 DEC 2022

तरुण भारत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# शहरातील उद्याने विकसित करू

## अप्पर जिल्हाधिकाऱ्यांचे आवाहन : किंग ऑफ द शो गुलाबचा मानकरी महालक्ष्मी पशुखाद्य

प्रतिनिधी
कोल्हापूर

कोल्हापूर शहरातील जी उद्याने आहेत, ती सर्व कोल्हापूर महानगरपालिका, गार्डन क्लब व नागरिकांच्या समन्वयातून विकसित करू. तसेच कोल्हापूर हे फुलांचे शहर करुया, असे आवाहन अप्पर जिल्हाधिकारी संजय शिंदे यांनी केले.

महानगरपालिका व गार्डन क्लब कोल्हापूर यांच्या संयुक्त विद्यमाने महावीर उद्यानामध्ये ५२ व्या पुष्प प्रदर्शनाचे आयोजन केले. याच्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते. यावेळी शहर अभियंता नेत्रदीप सरनोबत, उद्योजक सचिन शिरगांवकर, शांतादेवी डी. पाटील, गोकुळचे माजी संचालक अरुण नरके, सत्यजित कदम, अवधुत हरमळकर, कल्पना सावंत यांची प्रमुख उपस्थिती होती.

पुष्पप्रदर्शनाबरोबरच अनेक स्पर्धांचे आयोजन केले. यामध्ये गुलाब आणि विविध प्रकारची फुले, पुष्परचना, कुंडीतील रोपे, फुले, पाने



**कोल्हापूर : १) ५२ व्या पुष्प प्रदर्शनामध्ये बॉटनिकल फॅशन शो पाहताना युवती. २) क्विन ऑफ द शो गुलाब. ३) किंग ऑफ द शो गुलाब.**

व पाकळ्यांची रांगोळी, बुके, सॅलड डेकोरेशन, बोनसाय, मुक्त रचना, लँडस्केपिंग आदी स्पर्धांचे आयोजन केले. किंग ऑफ द शो गुलाबचा मानकरी महालक्ष्मी पशु खाद्य तर क्विन ऑफ द शो गुलाबचा मानकरी शिवाजी विद्यापीठ ठरले आहेत.

सायंकाळी तरुणाईचे आकर्षण असलेला लाईट्स व डीजे संगीताच्या साथीने होणारा बॉटनिकल फॅशन शो झाला. या बॉटनिकल फॅशन शोसाठी निसर्गातील पाना फुलांचा वापर केला होता. रविवारी सकाळी नऊ वाजता चित्रकला स्पर्धेचे आयोजन केले आहे.

सायंकाळी पाच वाजता विविध स्पर्धातील विजेत्या स्पर्धकांना बक्षीस वितरण समारंभ होणार आहे. पल्लवी कुलकर्णी, महापालिका उद्यान समिक्षक समीर व्यांघ्रबरे, शशिकांत कदम, राम चव्हाण आदी उपस्थित होते.